23-01-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 22-01-2025 22:48 Page 1



## निवडक

### हरमल येथे २४ पासून अखंड हरिनाम सप्ताह

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २२ :** वरचावाडा येथील श्री कलावतीदेवी यांच्या कृपा शिर्वादने परमार्थ निकेतन, बाल संस्कार केंद्र,मध्ये प.पू. आईच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह शुक्रवार दि. २४ ते गुरुवार दि. ३० रोजीपर्यंत परमार्थ निकेतन हरमल येथे साजरा होणार आहे.

यानिम्मित सप्ताहाची सुरुवात २३ रोजी रात्री ८.३० ते ९.३० पर्यंत गुरुपौर्णिमेच्या भजनाने होईल. दररोज सकाळी ७ ते ८.३० पुण्यतिथी प्रंतस्मरण व प पू आईचे चरित्र वाचन, १०.३० ते १२ पर्यंत पुण्यतिथी दुपारचा कार्यक्रम व चरित्र वाचन, संध्याकाळी ४ ते ५.३० पुण्यतिथी सायंस्मरण व सिद्धारुढ वैभव वाचन, रात्री ८ ते ९.३० श्रीकृष्ण प्रताप (श्रीकृष्णाचे अगाध लीलांचे वाचन, गौळणी व प्रदक्षिणा) सांगता होईल. दररोज संध्या ५ ते ६ पर्यंत वारांचे भजन,रात्री ८ ते ९.३० नित्योपासाना, प्रत्येक रविवारी दररोज सकाळी ८ ते ९.३० पर्यंत भजन प्रांतस्मरण व बालोपासना होतील. हरिप्रेमलहरी या पुस्तकात आखल्याप्रमाणे वर्षभर सर्व उत्सव होत असतात.

या उत्सवात सातही दिवस ओम नमो शिवाय या मंत्राचे अखंड नामस्मरण ठेवलेले आहे.सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत भगिनी वर्गाकरिता तर रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत पुरुष वर्गासाठी होईल.तरी बंधू भगिनींनी, बाल गोपलानी उपस्थित राहून श्री हरी प्रेमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री सिद्ध कला भजनी मंडळाने केले आहे.

---

### सातेरी खामिणी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचा रविवारी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. २२ :** बोणयेवाडा – सावईवेरे येथील श्री सातेरी खामिणी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचा अकरावा वर्धापनदिन रविवार दि. २६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ११ वाजता श्री खामिणी देवस्थानात श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होईल. संध्याकाळी ६ वाजता अखिल गोवा पातळीवर गीतगायन स्पर्धा होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

---

### साईबाबा मंदिरात २६ रोजी प्रजासत्ताक दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२ :** साईबाबा मंदिरात २६ रोजी प्रजासत्ताक दिन एकतानगर रहिवाशी असोसिएशनतर्फे रविवारी दि. २६ रोजी साईबाबा मंदिर (एकतानगर– म्हापसा) येथे सकाळी ९ वाजता प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून इंडस्ट्रियालिस्ट डॉ. गुरुदास नाटेकर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजाहरण होणार असून त्यानंतर डॉ. नाटेकर उपस्थितांना संबोधित करणार आहेत. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन एकतानगर रहिवाशी असोसिएशनचे अध्यक्ष अरुण कोरगावकर यांनी केले आहे.

---

### कुजिरा येथील धेंपे महाविद्यालयात २५ रोजी कविसंमेलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा (आयएमबी) आणि कुजिरा बांबोळी येथील एस. एस. धेंपे वाणिज्य तथा अर्थशास्त्र महविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने धेंपे महाविद्यालयाच्या सभगृहात शनिवार २५ रोजी, भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय बहुभाषिक कविसंमेलन होणार आहे.

यात विविध राज्यातील कवी मराठी, कोकणी, हिंदी, ऊर्दू, बंगाली, संस्कृत, इंग्रजी, कन्नड, भोजपुरी अशा भाषांतील कविता सादर करणार आहेत. मराठीतील ख्यातनाम कवी तथा वात्रटिकाकार रामदास फुटाणे हे कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषवतील. धेंपे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज कामत व आयएमबी चे अध्यक्ष दशरथ परब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील.

कविसंमेलनात महाराष्ट्रातील प्रा. गोविंद काजरेकर, गोव्यातील चित्रसेन शबाब व सोनाली सावळदेसाई परब मराठी, माधव बोरकर, निलबा खांडेकर, ग्लोदालुप डायस कोकणी, कोलकाता येथील डॉ. सोमा बंडोपाध्याय बंगाली, कर्नाटक येथील कृष्णा बडीगर कन्नड, बिहारचे संतोष कुमार भोजपुरी, गोव्याच्या सुनीता फडणीस संस्कृत, महाराष्ट्रातील जमालादुद्दीन चिस्ती ऊर्दू, बंगळुरू येथील अनुराधा सिंग हिंदी तर ब्रायन मेंडोंसा इंग्रजी मराठी सादर करतील.

उदय तिळवे, योगेश कापडी, मिनल कामत, अविनाश कुंकळकर (साहित्य), प्रदीप नाईक (तियात्र), विष्णू नाईक (भजन), अना सोझा, फोर्टिस फोर्टिस (संगीत), उल्हास केरकर, विजय देसाई (लोककला), गिरिश नावेलकर (हस्तकला), कालिदास सातार्डेकर.

**कला गौरव पुरस्काराचे मानकरी**

प्रदीप राजाराम परब, गजानन पांडुरंग चोडणकर, सिंधू चंद्रकांत परब, चिदानंद दत्ताराम मडकईकर (नाटक), रेखा पौडवाल, दादू पांडुरंग परब, सरस्वती दामोदर नाईक (साहित्य), मिंगेल जेकब कारमो लुईस फर्नांडीस ऊर्फ प्रिन्स जेकब जॉन वाझ, आंतोनिओ शावियेर कोरैया (तियात्र), अशोक मांद्रेकर, गजानन फोंडगी पागी, रत्नप्रभा संदीप नाईक, श्रीधर सावळो सतरकर (भजन), आग्नेलो संतान दा सिल्वा (संगीत), कल्याण भागू देविदास, आंतोनियो वाझ (लोक कला), श्रीकांत पंढरी सतरकर (हस्तकला), मधू नाईक गावकर (शिल्प), नंदकिशोर नाईक (पेंटिंग)

# भूमिगत केबलिंगच्या कामांमुळे रस्ते धोकादायक !

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. २२ :** भूमिगत केबलिंगच्या कामांसाठी खोदलेल्या रस्त्यांच्या स्थितीमुळे कुडतरीचे रहिवासी तीव्र संताप व्यक्त करत आहेत. अनेक तक्रारी असूनही, उंचसखल भराव आणि धुळीच्या परिस्थितीमुळे हे रस्ते पादचाऱ्यांसाठी आणि वाहनांसाठी धोकादायक बनले आहेत, ज्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला आहे.

पावसाळ्यानंतर काही पॅचवर्क दुरुस्ती सुरू करण्यात आली असली तरी, बऱ्याच ठिकाणी काम अर्धवट स्थितीत सोडून देण्यात आले आहे, ज्यामुळे रस्त्याचे मोठे भाग अत्यंत दयनीय स्थितीत आहेत. परिस्थिती असाह्य झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही अधिकाऱ्यांनी या समस्या सोडवण्याची कोणतीही तत्परता दाखवली नाही, असे स्थानिक रहिवासी आणि आम आदमी पक्षाचे (आप) नेते रुक मस्करेन्हास म्हणाले.

मस्करेन्हास यांनी अधोरेखित केले की रहिवाशांनी पीडब्ल्यूडीशी संपर्क साधण्याचे प्रयत्न व्यर्थ ठरले आहेत. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कोणतीही कालमर्यादा देण्यात आलेली नाही, तक्रारी आणि याचिका अनुत्तरीत राहिल्या आहेत. हे फक्त गैरसोयीबद्दल नाही. ते सुरक्षिततेबद्दल आहे. हे रस्ते त्यांचा वापर करणाऱ्या प्रत्येकासाठी धोका निर्माण करतात, असे ते पुढे म्हणाले.

उंचसखल भरावांमुळे असुरक्षित स्थिती निर्माण झाली आहे, खड्डे आणि सैल मातीमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. धुळीच्या परिस्थितीमुळे ही समस्या आणखी वाढली आहे, ज्यामुळे हवेच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे आणि आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, असे त्यांनी सांगितले. रस्ते सुरक्षित आणि वापरण्यायोग्य स्थितीत परत आणण्यासाठी रस्त्यांचे योग्य बॅकफिलिंग आणि पुनर्बांधणी सुनिश्चित करण्यासाठी रहिवाशांनी त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

हे मूलभूत पायाभूत सुविधांच्या व्यवस्थापनावर वाईट परिणाम करते, असे मस्करेन्हास यांनी नमूद करत प्रलंबित दुरुस्तीची जबाबदारी आणि प्राधान्य देण्याची मागणी केली. ही स्थिती आणखी बिघडू नये म्हणून अधिकाऱ्यांनी वेळीच पावले उचलावीत, अशी मागणी इथल्या रहिवाशांनी केली आहे.

# स्थानिकांना व्यवसाय मिळण्यासाठी आंदोलन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २२ :** शिरोडा येथे खाजगी कंपनी आणि स्थानिकांमध्ये स्थानिकांना पेलेट्स वाहतूक व्यवसाय मिळत नसल्याच्या मुद्द्यावरून तणाव निर्माण झाला. सकाळपासून आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांनी संध्याकाळपासून कंपनीच्या गेटकडे जाणारा रस्ता रोखला. त्यानंतर उपजिल्हाधिकारी रोहन नाईक, डीवायएसपी शिवराम वायंगणकर, पीआय विजयनाथ कवळेकर यांनी ग्रामस्थ आणि कंपनी यांच्यात चर्चा केली. उपाय शोधण्यासाठी सायंकाळी उशिरापर्यंत चर्चा झाली परंतु रात्री उशिरापर्यंत या समस्येवर तोडगा निघू शकला नाही.

बोरी–शिरोडा येथे आक्रमक होत ग्रामस्थ आणि स्थानिक ट्रक ट्रान्सपोर्टर्सनी ट्रक वाहतूक कपनीविरोधात आंदोलन केले . कंपनीचा वाहतूक व्यवसाय स्थानिकांना न दिल्यास कठोर कारवाईचा इशारा या संतप्त ट्रक चालकांनी दिला. गावकऱ्यांच्या मते, कंपनी गेल्या एक वर्षापासून त्यांना त्रास देत आहे. गेल्या वर्षी त्यांनी लोहखनिज पेलेट्सच्या वाहतुकीसाठी चांगल्या दरासाठी आंदोलन केले होते आणि आता या वर्षी कंपनी स्थानिक ट्रक मालकांना वाहतूक ट्रिप न देऊन स्थानिक ट्रक मालकांवर अन्याय करत आहे ज्यामुळे त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होत आहे.

शिवाय, गेल्या काही वर्षांत गावात कंपनीच्या कामकाजामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. प्रदूषणामुळे होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणासाठी आणि त्रासासाठी कंपनी कोणतीही भरपाई देत नाही किंवा स्थानिक तरुणांना नोकरीही देत नसल्याची तक्रार रहिवाशांनी केली आहे.

ट्रकचालकांनी सांगितले की ७५ ट्रक मालकांना २५ टक्के ट्रीप मिळतात तर २५ ट्रक असलेल्यांना ७५ टक्के ट्रीप मिळतात. हा मोठा अन्याय आहे. ट्रकचालकांनी निषेध करताना १०० टक्के वाहतूक स्थानिकांना हवी असल्याचे फलक लावले. काही स्थानिक छोटे–मोठे राजकारणी सत्तेत असल्याचा फायदा घेऊन कंपनीचा व्यवसाय बळकावून त्यांचा व्यवसाय खात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे, ज्यामुळे स्थानिकांना वाहतूक व्यवसायापासून वंचित ठेवले जात आहे. जर कंपनीने आपल्या धोरणात बदल केला नाही तर याविरोधात आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

# मिड डे मिल हेल्परची सरकारकडून होतेय पिळवणूक

▶ पमानधन वाढवण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २२ :** सरकार नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जोरदार प्रयत्न होत असताना गोव्यातील प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात माध्यान्य आहार देणाऱ्या आहार साहाय्यिकांना (मिड डे मिल हेल्पर) महिन्याला केवळ एक हजार रुपये असे अल्प प्रमाणात मानधन देण्यात येत आहे.

या मिड डे हेल्परना विद्यार्थ्यांना माध्यान्ह आहार वाढणे, त्यांची ताटे – बशा धुणे आणि साफसफाई करणे अशी कामे करावी लागतात. दररोज दिड–दोन तास त्यांचे काम चालते, पण त्यासाठी त्यांना नियमित विद्यालयात जावे लागते. सरकार त्यांना त्या बदल्यात नाममात्र फक्त एक हजार रुपये मासिक मानधन देते, पण ते मानधनसुद्धा पाच ते सहा महिन्यांनी मिळते. त्यांच्या कामाच्या बदल्यात अत्यंत कमी असा मोबदला मिळतो.त्यामुळे एकप्रकारे त्यांची कामाची पिळवणूक होत आहे. सरकार एका बाजूने नव्या शैक्षणिक धोरणासाठी विविध आर्थिक तरतुदी करीत असताना – माध्यान्ह आहार साहाय्यिकांच्या मानधन वाढीकडे मात्र पूर्णपणे डोळेझाक करत आहे. हे मिड डे हेल्परचे काम महत्वाचे काम आहे. त्यासाठी त्यांना योग्य व वेळेत मानधन मिळणे आवश्यक आहे. सरकारी कर्मचारी वर्गाला आठव्या वेतन आयोगाचा विचारही होत असताना दिसत आहे. पण या हेल्परना योग्य मानधन मिळणे गरजेचे आहे.

काही महिन्यांपूर्वी शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी सांगितले होते की, केंद्र सरकारच्या ६६ योजनेनुसार हे मानधन दिले जाते. ती पूर्णवेळ नोकरी नाही. शाळेशेजारील एखाद्या महिलेने शाळेला तासाभरासाठी मदत करणे अपेक्षीत आहे.

या मिड डे मिल हेल्परच्या मानधनात वाढ करण्याचा विचार असल्याचे सांगितले होते. परंतु अजून तसे काही झाल्याचे समजत नाही. माध्यान्ह आहार मदतनीस म्हणून काम आम्ही गरीब कुटुंबातील महिला काम करतो. घरची कामे करून एक–दोन तास शाळेत जाऊन ही कामे करणे शक्य असल्याने आम्ही हे काम करतो. सरकारकडून केव्हा तरी आपले मानधन वाढवले जाईल या अपेक्षेने आम्ही हे काम स्वीकारले आहे. आमची कोणतीही संघटना नाही. त्यामुळे आम्ही मानधन वाढीची मागणी करू शकत नाही. त्यामुळे सरकारने आम्हाला योग्य मोबदला द्यावा, अशी मागणी या मदतनीस महिला करीत आहेत.

# केबल ऑपरेटर्सचा विनंती अर्ज न्यायालयाने फेटाळला

**वीज खांबांवरच्या केबल्स काढून टाकण्याची मोहीम पुन्हा सुरू होणार**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** गोवा केबल टीव्ही नेटवर्किंग अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स असोसिएशनने दाखल केलेला दिवाणी अर्ज बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावला. या निर्णयामुळे आता परवानगीशिवाय वीजेच्या खांबांवर लावलेल्या तारा काढून टाकण्याची मोहीम पुन्हा सुरू करण्यास वीज विभाग मोकळा झाला आहे.

असोसिएशनने केबल तोडण्यापासून संरक्षण मिळावे यासाठी काही दिलासा मिळावा यासाठी हा अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने हा अर्ज फेटाळताना १ जानेवारीपासून लागू होणाऱ्या नवीन नियमांनुसार असोसिएशनला सरकारसमोर परवानग्या मागण्याची मुभा दिली आहे. कोर्टाने असे निरीक्षण नोंदवले आहे की ऑपरेटर्सनी तारा लावण्यासाठी परवानगी मागितली नाही किंवा त्यांच्याकडे तारा लावण्यासाठी परवानग्याही नाहीत.

बेकायदेशीर गोष्टी करता येणार नाहीत अशी सरकारने केबल ऑपरेटर्सच्या बाबतीत घेतलेली भूमिका न्यायालयाने कायम ठेवली. कोर्टाने असे निरीक्षण नोंदवले की शहर कुरूप दिसते आणि त्यामुळे सामान्य जनतेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या काही घटना घडल्या आहेत.

असोसिएशन अध्यक्ष आणि व्यापारी आनंद तळवलकर यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेत, त्यांनी न्यायालयाला विनंती केली होती की वीज विभाग आणि त्यांच्या कार्यकारी अभियंत्यांना त्यांच्या ग्राहकांना कनेक्टिव्हिटी प्रदान करणाऱ्या केबल्स कापण्यापासून, तोडण्यापासून किंवा डिस्कनेक्ट करण्यापासून रोखण्यासाठी अंतरिम मनाई आदेश जारी करावा.

वीज विभागाचे कार्यकारी अभियंता काशीनाथ शेट्ये म्हणाले, आतापर्यंत आम्हाला केबल ऑपरेटर्सकडून कोणतेही नवीन अर्ज मिळालेले नाहीत कारण त्यांच्याकडे जीआयएस मॅपिंग आणि इतर परवानग्या नाहीत. आम्ही महसूल मिळविण्यासाठी केबल्स काढण्याची प्रक्रिया सुरू केली, २०२० पासून आम्हाला तोटा सहन करावा लागत आहे आणि तो यापुढे सहन करता येणार नाही. सरकारच्या सूचनांनुसार आम्ही पुढील कारवाई करू, असे ते म्हणाले.. काही दिवसांच्या कारवाईनंतर वीज विभागाने ही प्रक्रिया थांबवली होती. तथापि, आता वीज विभाग त्यांच्या कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या केबल्स काढण्यास मोकळा आहे. इंटरनेट सेवा प्रदात्यांना आता घाबरण्याचे कारण आहे कारण त्यांच्या सेवा सुरू राहण्यासाठी शुल्क, दंड भरणे आणि विभागाला नवीन परवानग्यांसाठी अर्ज करणे याशिवाय कोणताही मार्ग नाही.

# वेर्णा आयडीसीमधील उद्योगांना कडक आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** वेर्णा येथील औद्योगिक वसाहतीत मंगळवारी झालेल्या आगीच्या घटनेमुळे गोवा इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्को यांनी या परिसरात कार्यरत असलेल्या उद्योगांना कडक निर्देश जारी केले आहेत. वाळलेल्या गवतापासून सुरू झालेली आग पार्क केलेल्या वाहनांमध्ये पसरून ही वाहने खाक झाल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याची काळजी रेजिनाल्ड यांनी व्यक्त केली.

संबंधित कंपनीला वाहने काढून टाकण्यासाठी पूर्वसूचना देऊनही, ही वाहने दोन ते तीन वर्षांपासून दुर्लक्षित पडून असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आम्ही वाहने काढून टाकण्याची नोटीस बजावली होती, परंतु त्यांनी त्याचे पालन केले नाही. आम्ही जबाबदार कंपनीविरुद्ध कारवाई करू, असे त्यांनी सांगितले.

या घटनेचे वर्णन करताना, रेजिनाल्ड म्हणाले की यामुळे उद्योगांना आगीच्या धोक्यांकडे लक्ष देण्याची तातडीची गरज अधोरेखित झाली आहे. मी सर्व उद्योगांना त्यांच्या परिसरातून कोरडे गवत आणि इतर ज्वलनशील पदार्थ साफ करण्याचे आणि अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. पालन न केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

आगीनंतर, रेजिनाल्ड यांनी उद्योगांना इस्टेटमधील सुरक्षा उपायांचा सखोल आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परिसर स्वच्छ ठेवणे आणि अग्निसुरक्षा नियमांचे पालन करणे सुनिश्चित करणे यावर त्यांनी भर दिला. हे निर्देश औद्योगिक सुरक्षा सुधारण्यासाठी आणि ज्वलनशील पदार्थांशी संबंधित जोखीम कमी करण्यासाठी व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहेत.

मंगळवारी वेर्णा आयडीसीमधील एका सर्वीस सेंटरवर लागलेल्या आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वाळलेल्या गवतापासून वेगाने पसरलेल्या भीषण आगीत पार्क केलेल्या ३३ गाड्या जळाल्या ज्यात २२ स्कोडा कार (एक डेमो वाहन) आणि ११ रेनॉल्ट कार सर्व्हिसिंगच्या प्रतीक्षेत होत्या वेर्णा , वास्को, मडगाव आणि फोंडा येथील अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले, परंतु प्राथमिक अंदाजानुसार कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

# डिचोली नितळ सुंदर प्लास्टिक मुक्त करणार

▶ नवनिर्वाचित नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर

■ टीम दैनिक हेराल्ड



डिचोली : नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर यांचे अभिनंदन करताना सोबत सर्व नगरसेवक.

**डिचोली, दि. २२ :** डिचोलीतील कचरा प्रकल्प हा राज्यातील एक आदर्श प्रकल्प असून त्या ठिकाणी विविध सुविधा उपलब्ध करताना कचऱ्या प्रकल्पाचे रुपांतर पर्यटन स्थळात करणार तसेच सुंदर, नितळ, प्लास्टिक मुक्त डिचोली करताना सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन कार्यरत राहणार असल्याचे डिचोलीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर यांनी सांगितले.

अपेक्षेप्रमाणे आज अधिकृतरित्या नगराध्यक्षपदी विजयकुमार नाटेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची निर्वाचन अधिकारी भीमनाथ खोरजुवेकर व मुख्याधिकारी सचिन देसाई यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी पालिकेतील सर्व १४ नगरसेवक उपस्थित होते.

माजी नगराध्यक्ष कुंदन फळारी तसेच इतर सर्व नगरसेवकांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. डिचोली आदर्श सुंदर स्वच्छ करतानाच कचरा मुक्त व्हावी यासाठी जो कचरा प्रकल्प सुरू आहे, त्याचा कायापालट करताना कचरा प्रकल्पाचे रूपांतर थेट पर्यटन स्थळ म्हणून करताना त्या ठिकाणी विविध सुविधा उपलब्ध करणे राज्यातील विद्यार्थ्यांना युवकांना कचरा प्रक्रियेची माहिती मिळावी यासाठी प्रयत्न करणे आधी अनेक वेगवेगळ्या योजना राबवण्याचा आपला संकल्प असल्याचे विजयकुमार नाटेकर यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, प्रदेश अध्यक्ष दामू नाईक, आमदार डॉ. चंद्रकांत शेटये, भाजपचे नेते गटाध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर तसेच सर्व नगरसेवकांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी आभारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्वांनाबरोबर घेऊन शहराचा विकास साधताना प्लास्टिक मुक्त डिचोलीचा नारा सर्वार्थाने यशस्वी करण्याचा आपला निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. भटकी गुरे व इतर ज्या ज्या ठिकाणी शहरात सुधारणा आवश्यक आहे, त्या करण्यासाठी लोकांच्या सूचना घेऊन काम करणार असे ते, म्हणाले. दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले विजयकुमार नाटेकर हे भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. तसेच स्वच्छता दूत म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत

रोज पहाटे शहरात कचरा गोळा करण्यासाठी ते फिरत असतात त्याचप्रमाणे प्लास्टिक मुक्त व कचरा मुक्ती साठी ते सतत कार्यरत असतात. शहरातील पायाभूत मूलभूत सुविधांना चलना देताना सरकारचे सहकार्य घेऊन वेगवेगळ्या योजना राबवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी केला.

# सरकारी प्राथमिक शाळा बंद केल्याबद्दल सरदेसाई यांचा हल्लाबोल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** राज्यातल्या सरकारी प्राथमिक शाळा धडाधड बंद होत असल्याच्या स्थितीवरुन गोवा फॉरवर्ड पार्टी (जीएफपी) चे अध्यक्ष आणि फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी बुधवारी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यावर तीव्र हल्लाबोल केला.

सरदेसाई यांनी खुलासा केला की सरकारी प्राथमिक शाळांची संख्या १,००० हून अधिकवरून फक्त ६९६ वर आली आहे, उर्वरित ५७७ शाळांमध्ये पाचपेक्षा कमी विद्यार्थी आहेत. ही घसरण सध्याच्या सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे झाल्याचा दावा सरदेसाई यांनी केला आहे.

फतोर्डाच्या वॉर्ड क्रमांक ४ मधील चंद्रावडो येथे सांडपाणी कामांच्या पायाभरणी समारंभात बोलताना सरदेसाई यांनी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वावर आणखी टीका केली. बाणावलीचे आम आदमी पक्षाचे (आप) आमदार वेंझी व्हिएगस यांनी सावंत आणि गोव्याचे पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांच्यात केलेल्या अलिकडच्या तुलनेला उत्तर देताना, सरदेसाई यांनी टिप्पणी केली की दोन्ही नेत्यांमध्ये महाराष्ट्राच्या बाजूने गोव्याची ओळख धोक्यात आणण्याची प्रवृत्ती होती, परंतु शिक्षणातील त्यांचा वारसा अगदी उलट होता. गोव्यात शेकडो सरकारी शाळा सुरू केल्याबद्दल बांदोडकर यांचे स्मरण केले जाते, तर त्या बंद केल्याबद्दल डॉ. सावंत यांचे स्मरण केले जाईल, असे सरदेसाई म्हणाले.

बाणावलीच्या रहिवाशांच्या राजकीय जागरूकतेवर त्यांनी विश्वास व्यक्त केला, जनमत सर्वेक्षणादरम्यान त्यांनी १०,००० हून अधिक मतांचे ऐतिहासिक योगदान नोंदवले. जनमत सर्वेक्षणादरम्यान आणि आजच्या काळातही बाणावलीचे लोक राजकीय घडामोडी समजून घेण्याइतके हुशार आहेत, असे त्यांनी निरीक्षण नोंदवले.

मडगाव नगर परिषदेच्या (एमएमसी) नगरसेवक पूजा नाईक आणि इतर जीएफपी नेते उपस्थित असलेल्या या कार्यक्रमादरम्यान, सरदेसाई यांनी स्थानिक पायाभूत सुविधांच्या विकासावरही भाष्य केले. त्यांनी घोषणा केली की फातोर्डा मतदारसंघाचा ९५% भाग आधीच सांडपाणी नेटवर्क अंतर्गत आला आहे, उत्तर मुख्य सांडपाणी ट्रंक पाईपलाईन पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ही छोटी पावले वाटू शकतात, परंतु ती आपल्या लोकांच्या कल्याणासाठी महत्त्वाची आहेत, असे सरदेसाई म्हणाले आणि दीर्घकालीन आणि नवीन अशा या उपक्रमाला पाठिंबा देण्याचे सर्व रहिवाशांना आवाहन केले.